महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार-अ, गुरुवार ते बुधवार, मे ९-१५, २०१३/वैशाख १९-२५, शके १९३५

## सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ एप्रिल २०१३

## अधिसूचना

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५.**

क्रमांक केमाअ.२०११/४४५/प्र.क्र. २५०/सहा.—माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा ५२) याच्या कलम २७ च्या पोट-कलम (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र माहिती अधिकार नियम, २००५ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना, महाराष्ट्र माहिती अधिकार (सुधारणा) नियम, २०१३ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम, २००५ (यात यापुढे ज्याचा "मुख्य नियम" असा निर्देश करण्यात आला आहे) याच्या नियम ३ मध्ये, "बँकेच्या धनादेशाद्वारे" या मजकुराऐवजी "बँकेच्या धनादेशाद्वारे किंवा भारतीय पोस्टल ऑर्डरद्वारे" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

३. मुख्य नियमांच्या नियम ४ मध्ये,—

(एक) पोट-नियम (१) मध्ये,—

(क) "बँकेचा धनादेश" या मजकुरानंतर "किंवा भारतीय पोस्टल ऑर्डर" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (ब) मध्ये, "त्यानंतरच्या प्रत्येक पंधरा मिनिटांकरिता (किंवा त्याच्या भागाकरिता)" या मजकुराऐवजी "त्यानंतरच्या प्रत्येक तासाकरिता (किंवा त्याच्या भागाकरिता)" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) खंड (ब) नंतर, आणि परंतुकाच्या अगोदर, पुढील खंड दाखल करण्यात येईल,—

"(क) नमुन्यांसाठी किंवा प्रतिकृतींसाठी, प्रत्यक्ष खर्च किंवा किंमत ;" ;

(दोन) पोट-नियम (२) मध्ये, "बँकेचा धनादेश" या मजकुरानंतर "किंवा भारतीय पोस्टल ऑर्डर" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

४. मुख्य नियमांच्या नियम ५ मध्ये,—

(क) पोट-नियम (१) मध्ये, "बँकेचा धनादेश" या मजकुरानंतर, "किंवा भारतीय पोस्टल ऑर्डर" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ख) पोट-नियम (२) मध्ये, "बँकेचा धनादेश" या मजकुरानंतर, "किंवा भारतीय पोस्टल ऑर्डर" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

पी. एस. मीना,
शासनाचे अपर मुख्य सचिव.